## नियमीत दिवाणी दावा क्रं.३२८/२०१७ मधील नि. १०५ खाली आदेश

प्रस्तुत दावा वादीने हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांच्या आधारे दावा दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**०३.** वादी यांनी अर्जात सुचविलेल्या दुरुस्त्या खालील प्रमाणे–

अ) दाव्याच्या टायटल क्लॉजमध्ये 'पन्हाळा' या मजकूराऐवजी 'कळे–खेरीवडे' व आकारणी रक्कम रु. १,२६,०००/– ऐवजी १,२७,०००/– असा मजकूर नमूद करणेस परवानगी मागितली आहे. तसेच दावा कलम ९,१०,११,१२, १६ या कलमामध्ये अर्जात नमुद केले प्रमाणे वेगवेगळया दुरुस्त्या मागितल्या आहेत.

**०४.** वर नमुद केले दावा दुरुस्तीस परवानगी मागून वादी मुळ केसशी विसंगत अशी कोणतीही नविन केस निर्माण करु पाहत नाहीत. दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांच्या आधारे वादी यांनी प्रस्तुतची दावा दुरुस्ती करणेस परवानगी घेणे भाग पडले आहे. सदरची दुरुस्ती औपचारिक व तांत्रीक स्वरुपाची

आहे. सदरची दुरुस्ती करणेस परवानगी दिलेस प्रतिवादी यांचे बचावावर कोणताही परिणाम होणार नाही. तसेच दावा दुरुस्तीस परवानगी न मिळालेस वादींचे कधीही न भरुन येणारे असे अतोनात नुकसान होणार असून वादींचे दावा मिळकतीमधील कायदेशीर हक्क डावलले जाणार आहेत. याउलट परवानगी दिलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही.

**०५.** प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सदर आर्जाचे पाठीमागे दाखल केले आहे. वादी यांच्या आर्जातील सर्व मजकूर चुकीचा व खोटा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. वादी यांना बेडरेस्टचा सल्ला दिला असलेने त्यांनी न्यायालयीन आयुक्तां मार्फत जबाब नोंदवणेसाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादी हे सदर दावा मिळकतीमध्ये केंव्हाही आलेले नव्हते. वादींनी सदरचा अर्ज हा भविष्यातील कथनांवर दाखल केला असून त्याप्रमाणे नविन केस निर्माण करुन या दावेचे कामी गुंतागुंत निर्माण करणेचा प्रयत्न करत आहेत.

**०६.** वादी यांनी केवळ कथित कथनावर सदर अर्ज दाखल करुन सदर कामी दावा मिळकतीबाबत घेतलेल्या जैसे थे परिस्थितीचा गैरफायदा घेणेच्या हेतूने काम चालविणेस विलंब करत आहेत. वादींचा सदरचा अर्ज मंजूर झालेस दावेचे कामी गुंतागुंत होणार आहे. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०७.** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे संपुर्ण 'रेकार्ड'

पहाता असे आढळते की, सदरचा दावा दि. ०४.०८.२०१६ रोजी दाखल केला आहे. सध्या दावा नि. ९४ वरील मनाई अर्जावर आदेशासाठी व वादीच्या उलटतपासावर प्रलंबित आहे. वरीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

०८. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत मुळ दावा हा हक्कज्ञापनासाठी व मनाईसाठी दाखल केला आहे. वादी यांच्या कथना प्रमाणे दावा दाखल केल्यानंतर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हे बांधकाम पाडून नविन बांधकाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे वादी यांनी त्या अनुषंगाने औपचारिक व तांत्रीक स्वरुपाच्या दुरुस्त्या मागितल्या आहेत.

०९. वादी यांनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे वेगवेगळया दुरुस्त्या सुचविल्या आहेत. वादींना दाव्यात मागीतलेल्या दुरुस्त्या करणेस परवानगी दिलेस प्रतिवादी यांना कोणत्याही नविन दावेस सामोरे जावे लागणार नाही अथवा दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तसे न केल्यास दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन दाव्याच्या न्यायनिर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

१०. अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. सदरचा अर्ज वादीने प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात आला.

२. अर्जात नमुद केलेल्या मजकुराच्या अनुषंगाने दुरुस्ती केवळ मंजुर करण्यात येते.

३. वादी यांनी दाव्यात तशी दुरुस्ती १४ दिवसात करावी.

Digitally signed by V. A. Lavand-Kokate
Date: 2023.10.03 17:54:37 +0530

V. A. Lavand-Kokate

दि.०३–१०–२०२३.
कळे–खेरीवडे.

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे–खेरीवडे.